Indian Academy of Pediatrics (IAP)

**महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना ( MAHAIAP )**

# पालकांसाठी मार्गदर्शक तत्वे :

**प्रकरण ३५ :**

# लहान मुलांमधील क्षयरोग

अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गान्गोलीया
सचिव २०२२-२३: डॉ. अमोल पवार
मार्गदर्शक: डॉ. जयंत उपाध्ये
समन्वयक: डॉ. नरेंद्र नानिवडेकर
अनुवाद: डॉ.चंद्रशेखर दाभाडकर
पुनरावलोकन: डॉ. नरेंद्र नानिवडेकर , उज्ज्वल करमळकर



*Convener:* **Varinder Singh**
*Members:* **Amol P Jaybhaye, Ankit Parakh, Narmada S**
*Reviewer:* **Ravinder Kumar Gupta**

क्षयरोगासारख्या दुर्धर आजारात योग्य वेळी निदान आणि योग्य कालावधीसाठी घेतलेली औषधे, यामुळे लहान मुलांमधील क्षयरोग आटोक्यात येऊ शकतो. क्षयरोगाचे निदान आणि त्याबद्दल घ्यायची काळजी याबद्दल आज आपण माहिती घेऊया

## क्षयरोगाबद्दल वारंवार विचारले जाणारे प्रश्न

प्रश्न १.एखाद्या मुलामध्ये क्षयरोग असल्याची शंका कधी घ्यावी ?
प्रश्न २.क्षयरोगाचे सर्व रुग्ण संसर्गजन्य असतात का? क्षयरोग असलेल्या एखाद्याच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाला संसर्ग होतो का? क्षयरोगाचा प्रसार कसा होतो?
प्रश्न ३.माझ्या मुलीला ताप आणि इतर लक्षणे आहेत.शाळेतील तिच्या एका मैत्रिणीला खोकला होता आणि नंतर तिला क्षयरोग झाल्याचे निदान झाल्याचे मला कळले म्हणून मी काळजीत आहे. तिला क्षयरोग आहे की नाही हे कसे कळेल?प्रश्न ४. क्षयरोग बरा होऊ शकतो का? त्यावर कसा उपचार केला जातो आणि पूर्ण बरा होण्यासाठी किती महिने उपचार करावे लागतात? माझे मूल नियमितपणे क्षयरोगाचे औषधोपचार घेत आहे. परंतु तरीही त्याला ताप आणि इतर लक्षणे आहेत. तिचे डॉक्टर म्हणतात यास थोडा वेळ लागेल पण मला काळजी वाटते.
प्रश्न ५.मी माझ्या मुलाला नियमितपणे औषधे देत आहे, परंतु औषधे पाहताच त्याला मळमळ होते आणि अनेकदा काही किंवा सर्व औषधे दिल्यानंतर उलट्या होतात. काही दिवस मी त्याला काही ठराविक गोळ्या देतो. मी असे करावे का?
प्रश्न ६.आता 3 आठवड्यांच्या उपचारानंतर माझ्या मुलीला उलट्या होत आहेत. मला वाटते तिचे डोळे देखील पिवळे दिसत आहेत.मी काय करू?
प्रश्न ७. मी माझ्या क्षयरोग झालेल्या बाळाला या आजाराशी सामना करण्यासाठी कुठला विशेष आहार द्यावा? आजारामुळे ती बरेच दिवस शाळेत गेली नाही. मी तिला कधी शाळेत पाठवू? आम्ही तिची भांडी कुंडी वेगळी ठेवली आहेत, पण ती तिच्या भावंडांबरोबर एकाच बिछान्यात झोपते. आम्ही काय करावे?
प्रश्न८ माझ्या मुलाच्या डॉक्टरांनी क्षयरोगाच्या उपचाराचे सहा महिने पूर्ण झाल्यावर औषधोपचार बंद करण्यास सांगितले आहे. औषधोपचार थांबवल्यानंतर दोन -तीन महिन्यांनी त्याला पुन्हा ताप आल्यामुळे मला काळजी पडली आहे. मी त्याच्या पुन्हा तपासण्या केल्या आणि त्याची मोंटू **(Montaux)**टेस्ट पॉझिटिव्ह असल्यामुळे मला खरोखरीच चिंता वाटते.
प्रश्न९. माझ्या लहान मुलाला क्षयरोग झाला असून मला असे सांगण्यात आले आहे की तिला एक वेगळा आणि उपचार करण्यास दुर्धर अशा पद्धतीचा म्हणजे अनेक औषधांना दाद न देणारा क्षयरोग झाला आहे (एमडीआरटीबी) हे काय आहे? माझ्या मुलीला हा आजार का झाला? तो वेगळा आहे म्हणजे काय?
प्रश्न १०.माझ्या मुलाची क्षयरोगासाठी तपासणी केली गेली कारण तो आजारी होता आणि त्याच्या क्षयरोगासाठी उपचार घेत असलेल्या आजोबांसोबत तो राहत होता. त्याच्या सर्व चाचण्या नॉर्मल आल्या असून फक्त क्षयरोग स्किन टेस्ट (मोंटू टेस्ट) पॉझिटिव्ह आली आहे. त्याच्या डॉक्टरने सांगितले की त्याला क्षयरोग नाही आणि त्यांनी त्याला जे औषधोपचार केले त्यांनी त्याला बरे वाटायला लागले आहे. मात्र मला काळजी आहे कारण मला सांगण्यात आलं आहे की पॉझिटिव स्किन टेस्ट याचा अर्थ त्याच्या शरीरामध्ये क्षयरोगाचे संक्रमण झाला आहे मात्र क्षयाची बाधा झालेली नाही .अशा मुलाला क्षयरोगाचे उपचार करणे गरजेचे आहे का?
प्रश्न श्र११.माझ्या मुलाला मी बीसीजी ही लस दिली आहे आणि बीसीजी लस ही क्षयरोग टाळण्यासाठी वापरली जाते असे मला सांगण्यात आले होते तर मग लसीकरणानंतर देखील माझ्या मुलाला क्षयरोग कसा झाला?
प्रश्न१२.माझ्या मुलाचे क्षयरोगाचे निदान एक महिन्यापूर्वी झाले होते निदानावेळी मला सांगण्यात आले की त्याला फुफ्फुसाचा क्षयरोग आहे. मी आत्ताच ऐकले की माझ्या एका सहकारी व्यक्तीला तिच्या मेंदूमध्ये क्षयरोग झाल्याचे निदान झाले आहे. आता मला माझ्या मुलाबद्दल काळजी वाटते आहे आणि मला असा प्रश्न पडला आहे की त्याचा क्षयरोग फुफ्फुसापासून शरीराच्या इतर भागांमध्ये पसरेल का ?
प्रश्न १३.माझ्या मुलाचे क्षयरोगाचे निदान झाले आहे आणि तो डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचार घेत आहे. मी त्याला डॉक्टरांकडे तपासणीसाठी किती वेळा इस्पितळात घेऊन जावे?
प्रश्न१4. माझ्या एक वर्षाच्या मुलाचे क्षयरोगाचे निदान केले गेले आहे. त्याचा त्याच्या वाढ आणि विकासावर काही दूरगामी परिणाम होईल का ? दरम्यानच्या काळात मी त्याचे नेहमीचे लसीकरण चालू ठेवावे का?

**Under the Auspices of the IAP Action Plan 2020–2021**

**Piyush Gupta** IAP President 2021
**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021
**Bakul Parekh** IAP President 2020
**GV Basavaraja** IAP HSG 2020–2021
**Deepak Ugra** National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

**Core Group**

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

35

# लहान मुलांमधील क्षयरोग

प्रश्न १

## एखाद्या मुला मध्ये क्षयरोग असल्याची शंका कधी घ्यावी ?

खालील लक्षणे असलेल्या कोणत्याही बालकाला क्षयरोग असण्याची शक्यता असते.

- दोन आठवड्यापेक्षा जास्त ताप किंवा खोकला
- गेल्या ३ महिन्यामध्ये ५ % पेक्षा जास्त वजन कमी होणे किंवा वाढणे
- खूप सुस्तता येणे
- भूक न लागणे किंवा
- मानेत, छातीत, काखेत किंवा जांघेत वेदना रहित गाठी येणे
- अनेकदा बडक्यांसाहित खोकला येणे आणि कधीकधी मोठ्या मुलात खोकल्यात रक्त पडणे.
- बाळास सातत्याने मळमळ होणे, उलट्या होणे, सुस्तता येणे, डोके दुखणे, वर्तनात बदल होणे, शाळेच्या प्रगतीत अडथळा येणे, आणि अचानक बेशुद्ध पडणे, झटके येणे ही लक्षणे दिसल्यास मेंदूच्या टी बी ची लक्षणे आहेत. (न्यूरो-क्षयरोग).
- पाठीत वेदना होणे, पाठीच्या खालील भागात माणक्यावर सूज येणे, दोन्ही पायातील शक्ति कमी होणे (लकवा) ही लक्षणे मणक्याचा किंवा हाडाचा क्षयरोग दर्शवतात.
- आपले बाळ अनेक दिवस आजारी असेल, किंवा वारंवार आजारी पडत असेल आणि श्वसनसंस्थेचा क्षयरोग असलेल्या रुग्णांच्या संपर्कात येणे अशा वेळेस आपल्या बाळाला क्षयरोग असण्याची शक्यता जास्त असते.
- आपल्या बाळात वरील लक्षणे दिसत असतील तरी ती क्षयरोग व्यतिरिक्त इतर आजाराची सुद्धा असू शकतात. अशा वेळेस तज्ञांचे मत अवश्य घ्या.

प्रश्न
२

## क्षयरोगाचे सर्व रुग्ण संसर्गजन्य असतात का?
## क्षयरोग असलेल्या एखाद्याच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाला संसर्ग होतो का?
## क्षयरोगाचा प्रसार कसा होतो?

नाही! क्षयरोगाने ग्रस्त असलेली प्रत्येक व्यक्ति संसर्गजन्य नसते. किंवा क्षयरुग्णाच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाला संसर्ग किंवा आजार होत नाही. जरी क्षयरोग असलेल्या रुग्णाशी संपर्क हा प्रसाराचा सर्वात सामान्य मार्ग आहे, परंतु काही वेळेस रुग्णाशी संपर्क झाला तरी क्षयाचे जंतु शरीरात शिरतात पण हा आजार होत नाही. असे भाग्यवान खूप कमी असतात! केवळ संसर्गाशिवाय रोगापासून बचावणे भाग्यवान असू शकतात किंवा ते पूर्णपणे सुटू शकतात. लक्षात ठेवा की प्रत्येकजण इतका भाग्यवान असू शकत नाही! बहुतेकांना क्षयरोग ग्रस्त असलेल्या रुग्णपासून आजार होतोच !

जेव्हा क्षयरोगग्रस्त व्यक्तीला लक्षणीय खोकला असतो तेव्हा हा धोका सर्वाधिक असतो. रोगाचा प्रसार हवेतून होत असल्याने, खोकल्याच्या रुग्णांची स्वच्छता, आजाराचा कालावधी आणि रुग्णाशी जवळीक हे महत्त्वाचे घटक क्षयाचा आजार लवकर पसरवितात. घरात, शाळेत किंवा नोकरीच्या व कामाच्या ठिकाणी ( किंवा जेथे दीर्घकाळ संपर्कात राहण्याचा धोका असतो). इतर निरोगी व्यक्तींना क्षयरोग झालेल्या

रुग्णापासून संसर्ग होण्याचा धोका अनेकपटींनी जास्त असतो.

संपर्क झालेल्या व्यक्तीला संसर्ग झाला आहे की नाही हे तपासण्यासाठी त्वचा आणि रक्तचाचण्या उपलब्ध आहेत आणि संक्रमित लोकांमध्ये शरीरात रोगाचा फैलाव रोखण्यासाठी औषधेदेखील उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे, क्षयाची लक्षणे असलेल्या संशयीतामध्येही चाचणी केली जाऊ शकते.

## प्रश्न 3

**माझ्या मुलीला ताप आणि इतर लक्षणे आहेत. शाळेतील तिच्या एका मैत्रिणीला खोकला होता आणि नंतर तिला क्षयरोग झाल्याचे निदान झाल्याचे मला कळले म्हणून मी काळजीत आहे. तिला क्षयरोग आहे की नाही हे कसे कळेल?**

तुमच्या बाळाला क्षयरोगसारखी लक्षणे असतील किंवा तुमचे बाळ क्षयरोगग्रस्त असलेल्या कोणत्याही रुग्णाच्या संपर्कात आले आहे आणि आजारी पडले आहे अशा मुलामध्ये क्षयरोग चाचण्या करणे आवश्यक आहे. सर्वात महत्वाची व प्राथमिक तपासणी म्हणजे छातीचा एक्स-रे. त्यात जर कांही वावगे आढळले तर खोकल्यातून पडणाऱ्या थुंकीची (बडक्याची sputum) तपासणी केली जाते. जेव्हा लहान मुलास थुंकी काढत येत नाही तेंव्हा त्यास थुंकी काढण्याची औषधे दिली जातात अथवा त्याने गिळलेली व पोटात जमा झालेली थुंकी विशिष्ट नळीने काढून तपासली जाते. काही वेळेस शरीरात क्षयरोग आजारामुळे जमा झालेला पू अथवा छातीत जमा झालेले पाणी काढून त्याची चाचणी केली जाते.क्षयरोगाचे निदान करणे याला अनुभव व कौशल्य लागते. तेव्हा मनानेच या चाचण्या करणे टाळावे.क्षयरोगाचे निश्चित निदान झाल्यावरच क्षयरोगाचे औषधोपचार सुरू करता येतात.

## प्रश्न ४

**क्षयरोग बरा होऊ शकतो का?**
**त्यावर कसा उपचार केला जातो आणि पूर्ण बरा होण्यासाठी किती महिने उपचार करावे लागतात?**

बहुतेक रुग्णांमध्ये क्षयरोगाचा संपूर्ण यशस्वी उपचार केला जाऊ शकतो. क्षयरोगावरील औषधे शासनातर्फे मोफत उपलब्ध आहेत. क्षयरोगाचा सर्वात सामान्य प्रकार म्हणजे छातीचा (फुफ्फुसाचा) क्षयरोग. त्यावर तोंडावाटे दिलेल्या औषधांनी कमीतकमी ६ महिने उपचार करावे लागतात. सुरुवातीच्या २ महिन्यांनंतर औषधामध्ये थोडासा बदल होतो कारण सुरुवातीला वापरलेल्या चार औषधांपैकी एक औषध कमी करावे लागते. रुग्णाला हाडांचा किंवा मेंदूचा क्षयरोग असल्यास किमान १२ महिने उपचार घ्यावे लागतात.उपचाराने रुग्णाला बरे वाटायला साधारणपणे काही दिवस ते ४ आठवडे लागतात. तथापि, लक्षणे कमी झाल्यानंतरही उपचार घेणे आवश्यक आहे. (बरे वाटल्यावर मनाने औषधोपचार बंद करू नयेत). कारण रोग बरा होण्यासाठी अनेक महिने उपचार घ्यावे लागतात. उपचारांचे पालन आणि पूर्ण कोर्स पूर्ण करणे हे संपूर्ण आजाराचे उच्चाटन करण्यासाठी अत्यावश्यक आहे.

**प्रश्न ५**

**मी माझ्या मुलाला नियमितपणे औषधे देत आहे, परंतु औषधे पाहताच त्याला मळमळ होते आणि अनेकदा काही किंवा सर्व औषधे दिल्यानंतर उलट्या होतात. काही दिवस मी त्याला काहीकाही गोळ्या देतो. मी असे करावे का?**

काही मुलांना औषधांचा वास किंवा चव घेतल्यानंतर उलटी होते. पण क्षयरोग हा एक गंभीर आजार असून त्यावर त्वरित आणि संपूर्ण औषधोपचार करणे अनिवार्य आहे. तुम्ही कोणत्याही साखरेच्या गोड द्रवपदार्थाबरोबर किंवा एक चमचे जाममध्ये मिसळून औषधाची चव लपवण्याचा प्रयत्न करू शकता. क्षयरोगाची बहुतेक औषधे चांगल्या चवीच्या विरघळणाऱ्या (फ्लेवर्ड,डिस्पर्सीबल) गोळ्या म्हणून उपलब्ध आहेत ज्या पाण्यात सहज विरघळल्या जाऊ शकतात आणि मुलांना दिल्या जाऊ शकतात. सल्ल्याशिवाय एक किंवा अधिक औषधे बंद करणे (किंवा औषधांमुळे वारंवार उलट्या होणे व पोटात औषध न रहाणे) यामुळे उपचारास योग्य तो प्रतिसाद मिळत नाही तसेच या औषधांना प्रतिकार निर्माण (*Resistance*)होतो. अगदी एक दिवस पण औषधे अपूर्ण डोसमध्ये देऊ नका, पूर्ण डोसच द्या. तुमच्या मुलाला सातत्याने उलट्या होत असल्यास, तुम्ही तुमच्या डॉक्टरांना त्वरित भेटा.

**प्रश्न ६अ**

**माझ्या मुलीने तिच्यावर उपचार सुरू केल्यापासून केशरी रंगाची लघवी होत होती. मला असे वाटले कारण क्षयरोगविरोधी औषधे शरीरात खूप उष्णता निर्माण करतात.**

रिफामपीसीन हे लाल रंगाचे औषध असून या क्षयरोगाच्या औषधाने लाल-केशरी रंगाची लघवी होऊ शकते. घामही या रंगाचा येऊ शकतो. यात काळजीचे कारण नाही. हा औषधाचा दुष्परिणाम नाही.

**प्रश्न ६ब**

**आता,3 आठवड्यांच्या उपचारानंतर माझ्या मुलीला उलट्या होत आहेत. मला वाटते तिचे डोळे देखील पिवळे दिसत आहेत. मी काय करू ?**

क्षयरोगाची औषधे काहीवेळा सहन होत नाहीत आणि मुलाच्या यकृतावर परिणाम होतो. त्यामुळे भूक न लागणे, मळमळ, उलट्या आणि कधीकधी कावीळ (डोळ्यांचा पिवळा रंग दिसणे) अशी चिन्हे दिसू लागतात.यासाठी उपचारात बदल करावा लागेल. अशा वेळेस तुमचे डॉक्टर औषधामुळे यकृतावर झालेला परिणाम शोधण्यासाठी काही रक्त चाचण्या करतील. आणि नंतर उपचारात बदल करतील.बहुतेक मुले कालांतराने ही औषधे सहन करू शकतात ही औषधे मनाने थांबवू नका किंवा स्वतःच परत सुरू करू नका आणि अशा परिस्थितीत तुमच्या डॉक्टरांशी संपर्क साधण्यास उशीर करू नका.

## प्रश्न ७

**मी माझ्या क्षयरोग झालेल्या बाळाला या आजाराशी सामना करण्यासाठी कुठला विशेष आहार द्यावा? आजारामुळे ती बरेच दिवस शाळेत गेली नाही. मी तिला कधी शाळेत पाठवू मी तिला कधी शाळेत पाठवू? आम्ही तिची भांडी कुंडी वेगळी ठेवली आहेत, पण ती तिच्या भावंडांबरोबर एकाच बिछान्यात झोपते. आम्ही काय करावे?**

स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेला सकस आहार देणे अधिक चांगले. ऊपचार सुरू केल्यानंतरही जर मुलाचे वजन कमी झाले असेल किंवा वाढले नसेल तर त्याचे कारण शोधण्यासाठी तज्ञांची मदत घेणे चांगले.

आजारी किंवा खोकला असलेल्या मुलाला शाळेत पाठवू नये. यांचे कारण एक तर त्याला लवकर बरे होण्यास मदत होईल आणि त्याचपासून इतरांना हा आजार होणार नाही आणि आजाराचा प्रसार होणार नाही. इतरांना संसर्ग टाळण्याकरीता फेसमास्क वापरणे, खोकताना, शिंका आल्यानंतर चेहरा नियंत्रित करा किंवा खोकताना चेहरा झाकणे ही सवय लावणे महत्वाचे. रुग्ण बालकाची थुंकीचे उकळत्या पाण्याचा वापर करून योग्य प्रकारे विल्हेवाट लावावी.गर्दीच्या आणि बंद ठिकाणी जाणे टाळावे. निदान आजाराची लक्षणे कायम असेपर्यंत (यशस्वीउपचारासाठी/ लक्षणे कमी होण्या करिता साधारण एक महिना लागतो). या गोष्टी रोगाचा प्रसार कमी होण्याकरिता आवश्यक आहेत.

रुग्ण बालकांना पूर्णपणे वेगळे ठेवून त्यांच्या मनावर विपरीत परिणाम होईल असे वर्तन करू नका. एकत्रित जेवण करण्यास काहीच हरकत नाही. यामुळे संक्रमणाचा धोका वाढत नाही. त्याच्या आजाराकरिता त्याला कधीच दोष देऊ नका किंवा त्याला दटावू नका. त्याच्या वयोमानानुसार संयमाने त्याला या आजाराचा संसर्ग त्याच्यामुळे इतरांना होणार नाही याबद्दल समजावून सांगा.आजाराची लक्षणे असताना भावंडांबरोबर शक्यतो एकाच अंथरुणावर झोपणे टाळा.

## प्रश्न ८

**माझ्या मुलाच्या डॉक्टरांनी क्षयरोगाच्या उपचाराचे सहा महिने पूर्ण झाल्यावर औषधोपचार बंद करण्यास सांगितले आहे. औषधोपचार थांबवल्यानंतर दोन- तीन महिन्यांनी त्याला पुन्हा ताप आल्यामुळे मला काळजी पडली आहे. मी त्याच्या पुन्हा तपासण्या केल्या आणि त्याची मोंटू (Montaux) टेस्ट पॉझिटिव्ह असल्यामुळे मला खरोखरीच चिंता वाटते.**

हाडाचा, मेंदूचा क्षयरोग आणि औषधांना दाद न देणारा क्षयरोग सोडल्यास इतर प्रकारच्या क्षयरोगावर सहा महिन्याचे उपचार हे पुरेसे असतात.सुरुवातीची औषधे व्यवस्थित दिली गेली असली तर हा आजार पुन्हा होण्याची शक्यता खूपच कमी असते. या आजाराचा पुन्हा डोके वर काढण्याचा काळ हा पहिल्या वर्षात जास्त असतो.मात्र नंतरही या आजाराची लक्षणे दिसून येऊ शकतात. एखादा क्षयरोगाचा आजार हा पुन्हा उद्भवला आहे किंवा तो आजार पूर्ण बरा झाला नाहीये अशी शंका औषधोपचार चालू असताना देखील घ्यावी लागते, त्याचबरोबर ही लक्षणे दुसऱ्या कुठल्या कारणाने देखील असू शकतात. हा आजार पुन्हा उद्भवला आहे हे सिद्ध करण्यासाठी खूप सखोल तपासणी करावी लागते आणि त्याचबरोबर औषधोपचारांना दाद दिली जाते आहे की नाही याची देखील तपासणी करणे गरजेचे असते. महत्त्वाची बाब ही की मोंटू तपासणी औषधोपचार पूर्ण केल्यानंतर आणि रुग्ण पूर्ण बरा झाल्यानंतर देखील पॉझिटिव्ह राहते आणि त्याला तसा काही अर्थ उरत नाही. तसेच छातीच्या एक्स- रे मध्ये काही विशिष्ट दोष आपल्याला दिसून येतील (उदाहरणार्थ एखादी जखम भरल्यावर राहिलेला व्रण) तुमच्या मुलाला या आजाराची लागण असेल तर अशा वेळी तज्ञ माणसांचा सल्ला आणि तपासण्या करून हे दिसणारे दोष हा बऱ्या झालेल्या आजाराचा भाग आहे की आजार अजूनही चालू आहे की त्याला दुसरा आजार आहे हे पहावे लागेल.

## प्रश्न ९

**माझ्या लहान मुलाला क्षयरोग झाला असून मला असे सांगण्यात आले आहे की तिला एक वेगळा आणि उपचार करण्यास दुर्धर अशा पद्धतीचा म्हणजे अनेक औषधांना दाद न देणारा क्षयरोग झाला आहे (एमडीआरटीबी) हे काय आहे? माझ्या मुलीला हा आजार का झाला? तो वेगळा आहे म्हणजे काय?**

अनेक औषधांना दाद न देणारा क्षयरोग याचा अर्थ रीफाम्पिसीन आणि इतर औषधांना हा जंतू दाद देत नाही. हा प्रतिकार तपासणी करून खात्री केली जाते आणि त्यासाठी आपल्याला थुंकी,पस किंवा शरीरातील इतर स्त्राव यांची तपासणी करावी लागते. औषधांना दाद न देणारा आजार होण्यासाठी अयोग्य उपचार, उपचार मध्येच थांबवणे किंवा ज्या व्यक्तीला अशा पद्धतीचा आजार झाला आहे त्याच्या कडून तुम्हाला तो आजार मिळणे ही कारणे होत. ज्या व्यक्ती कडून हा आजार येतो, त्याने अनेक औषधांचे उपचार करून झाले आहे, त्याला बरेच दिवस उपचार चालू आहेत किंवा क्षयरोगामुळे त्याचा मृत्यू झाला आहे अशा वेळी आपण अशी शक्यता गृहीत धरू शकतो की त्या आजाराचे स्त्रोत असलेल्या व्यक्तीला औषधाला दाद न देणारा क्षयरोग झाला होता.अनेकदा क्षयरोग झालेली ही व्यक्ती आपल्याला माहित देखील नसते. औषधांना दाद न देणाऱ्या क्षयरोगामध्ये उपचार हे नेहमीपेक्षा वेगळे, प्रदीर्घ काळ चालणारे आणि उपचाराला दाद देण्याची वेळ ही खूप उशिराची असू शकते.

## प्रश्न १०

**माझ्या मुलाची क्षयरोगासाठी तपासणी केली गेली कारण तो आजारी होता आणि त्याच्या क्षयरोगासाठी उपचार घेत असलेल्या आजोबांसोबत तो राहत होता. त्याच्या सर्व चाचण्या नॉर्मल आल्या असून फक्त क्षयरोग स्किन टेस्ट (मोंटू टेस्ट) पॉझिटिव्ह आली आहे. त्याच्या डॉक्टरने सांगितले की त्याला क्षयरोग नाही आणि त्यांनी त्याला जे औषधोपचार केले त्यांनी त्याला बरे वाटायला लागले आहे. मात्र मला काळजी आहे कारण मला सांगण्यात आलं आहे की पॉझिटिव स्किन टेस्ट याचा अर्थ त्याच्या शरीरामध्ये क्षयरोगाचे संक्रमण झाला आहे मात्र क्षयाची बाधा झालेली नाही .अशा मुलाला क्षयरोगाचे उपचार करणे गरजेचे आहे का?**

उत्तर- लक्षात ठेवा की क्षयरोगाचा संक्रमण याचा अर्थ तो क्षयरोगाने पछाडला आहे असे नाही. ज्या कोणाला ह्या आजाराचे संक्रमण मिळते त्याला हा पूर्ण आजार होईलच असे नाही. जर एखाद्याला क्षयरोगाची प्रत्यक्षण झाली असेल आणि त्याला आजाराची लक्षणे असतील तर त्याला पुढच्या तपासण्या करणे गरजेचे आहे. जर तुमच्या मुलाला पॉझिटिव्ह मोंटू टेस्टवरून क्षयरोगाच्या जंतुसंसर्गाच्या काही पुरावा मिळत असेल तर त्याला किंवा तिला क्षयरोगाची उपचार करण्याची गरज पडेल. क्षयरोगाने पछाडलेल्या व्यक्तीच्या जवळच्या संपर्कात असलेल्या व्यक्तींना क्षयरोगासाठी छाननी करणे गरजेचे आहे.जर त्याला क्षयरोगाची बाकी कोणतीही लक्षणे नसली आणि त्याची स्किन टेस्ट पॉझिटिव्ह असली तर अशा व्यक्तीला क्षयरोगाचे प्रत्यक्षण होऊन तो संक्रमणावस्थेत आहे असे समजावे आणि त्याला क्षयरोग प्रतिबंधक औषधोपचार करणे गरजेचे आहे. क्षयरोग प्रतिबंधक औषधोपचारांमध्ये एकमेव औषध आयसोनियाझाईड म्हणजेच आयसोनिकोटीनिक ॲसिड हायड्राझाईड (INH) हे औषध दिवसातून एक वेळा सहा महिन्यासाठी दिले जाते. यामुळे त्या बाधित व्यक्तीला क्षयरोगाचा आजार होण्याची शक्यता खूप कमी होते. हे सर्वसाधारणपणे अतिशय सुरक्षित आणि विनासायास पचवले जाणारे औषध आहे.

**प्रश्न ११**

**माझ्या मुलाला मी बीसीजी ही लस दिली आहे आणि बीसीजी लस ही क्षयरोग टाळण्यासाठी वापरली जाते असे मला सांगण्यात आले होते तर मग लसीकरणानंतर देखील माझ्या मुलाला क्षयरोग कसा झाला?**

बीसीजी लस मुलाला जन्माच्या वेळी देण्यात येते ज्यामुळे त्या मुलाला क्षयरोगाची गंभीर मात्रा उदाहरणार्थ मिलीअरी क्षयरोग, मेंदूला होणारा क्षयरोग यापासून बऱ्यापैकी सुरक्षितता मिळते. मात्र ही सुरक्षितता शंभर टक्के नसते तसेच फुफ्फुसाच्या क्षयरोगापासून बचाव करण्यासाठी ही लस खूप ताकदवान नाही. त्यामुळे जरी त्या मुलाला लस दिली असली तरी फुफ्फुसामध्ये क्षयरोग होण्याची शक्यता राहते.

**प्रश्न १२**

**माझ्या मुलाचे क्षयरोगाचे निदान एक महिन्यापूर्वी झाले होते निदानावेळी मला सांगण्यात आले की त्याला फुफ्फुसाचा क्षयरोग आहे. मी आत्ताच ऐकले की माझ्या एका सहकारी व्यक्तीला तिच्या मेंदूमध्ये क्षयरोग झाल्याचे निदान झाले आहे. आता मला माझ्या मुलाबद्दल काळजी वाटते आहे आणि मला असा प्रश्न पडला आहे की त्याचा क्षयरोग फुफ्फुसापासून शरीराच्या इतर भागांमध्ये पसरेल का ?**

क्षयरोग हा पूर्ण बरा होणारा आजार आहे आणि जर डॉक्टरी सल्ल्यानुसार तुम्ही योग्य ती औषधे योग्य त्या कालावधीसाठी घेतली तर तो बरा होण्याची शक्यता खूप जास्त आहे. मात्र तुम्ही नियमित औषधोपचार घेतले नाहीत किंवा औषधोपचार पूर्ण केले नाहीत किंवा तुम्हाला झालेल्या क्षयरोगाचा जंतू औषधांना दाद न देणारा असेल तर मात्र हा जंतू तुमच्या फुफ्फुसातून शरीराच्या इतर भागात उदाहरणार्थ लसीच्या गाठी, मेंदू, हाडे इत्यादी ठिकाणी लसीद्वारे आणि रक्ताद्वारे पसरण्याची शक्यता आहे.अत्यंत क्वचित प्रसंगी योग्य ते औषध घेऊन देखील काही रुग्ण आणि जंतूच्या विशिष्ट घटकांमुळे हा आजार सर्व शरीरभर पसरू शकतो.

## प्रश्न १३

**माझ्या मुलाचे क्षयरोगाचे निदान झाले आहे आणि तो डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचार घेत आहे. मी त्याला डॉक्टरांकडे तपासणीसाठी किती वेळा इस्पितळात घेऊन जावे?**

सर्वसाधारणपणे तुमचे डॉक्टर तुम्हाला दोन आठवड्यानंतर पुनर्तपासणीसाठी बोलावतील. त्यावेळी ते खात्री करतील की उपचार विनासायास चालू आहेत आणि त्यानंतर दोन महिन्यानंतर त्याला पुन्हा तपासणीसाठी बोलावतील.यावेळी त्याच्या औषधांच्या मात्रेमध्ये थोडा फरक केला जाईल म्हणजेच चार औषधांवरून आता तीन औषधांवर बदल करण्यात येईल. त्याच्यापुढे तुमचे डॉक्टर तुम्हाला दर दोन महिन्यानंतर औषधोपचार संपेपर्यंत बोलावतील. जर लक्षणात काही सुधार झाला नाही किंवा उपचार सुरू झाल्यावर ती काही लक्षणांमध्ये किंवा तुमच्या मुलाच्या प्रकृतीत काही बिघाड निर्माण झाला तर या व्यतिरिक्त तुम्हाला डॉक्टरांच्या सल्ल्यासाठी अधूनमधून जावे लागेल. त्याचप्रमाणे काही नवीन लक्षणे दिसू लागली किंवा औषधोपचारांचा काही विपरीत परिणाम उदाहरणार्थ मळमळ,उलट्या भूक मंदावणे, सांधे सुजणे, दृष्टीस काही दोष उत्पन्न झाल्यास तज्ञांची भेट घेणे गरजेचे आहे. तुमच्या मुलाचा जो ठरलेला उपचाराचा कालावधी आहे तो डॉक्टरी सल्ल्यानुसार तुम्ही पूर्ण करणे गरजेचे आहे आणि त्यानंतर देखील पुन्हा तपासणीसाठी तुमच्या डॉक्टरांना दर तीन ते सहा महिन्याने भेट दिली पाहिजे. हे काम एक वर्ष केले पाहिजे

## प्रश्न १४

**माझ्या एक वर्षाच्या मुलाचे क्षयरोगाचे निदान केले गेले आहे. त्याचा त्याच्या वाढ आणि विकासावर काही दूरगामी परिणाम होईल का ? दरम्यानच्या काळात मी त्याचे नेहमीचे लसीकरण चालू ठेवावे का?**

क्षयरोग तुमच्या मुलाच्या वाढ आणि विकासावर परिणाम करू शकतो. मात्र क्षयरोगाच्या उपचार चालू असताना त्याला योग्य तो आहार दिल्यास त्याच्या वाढीवर जो परिणाम होऊ शकतो तो टाळता येतो. क्षयरोगावर उपचार घेत असताना बहुतांशी मुले त्यांचे कमी झालेले वजन चार ते पाच आठवड्यात पुन्हा प्राप्त करतात. त्यांचा लसीकरणाचा नेहमीचा तक्ता विना अडथळा पूर्ण केला पाहिजे. मात्र तापाच्या काळात लसीकरण थोडे दिवस पुढे ढकलावे लागेल. क्षयरोगावर उपचार चालू असताना नेहमीचे लसीकरण केल्यास त्यांना कोणताही जादाचा धोका नाही.